**महाराष्ट्र शासन**
**राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२५/प्र.क्र.७२/रासेयो कक्ष दिनांक : ६ ऑगस्ट, २०२५,

**प्रति,**
**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक**
रासेयो संलग्नित, सर्व विद्यापीठे/संचालनालये

**विषय :- राज्यात " हर घर तिरंगा अभियान" राबविणे बाबत....**

**संदर्भ :-** १.क्र.संकिर्ण-८२२५/प्र.क्र.४०७/सां.का.४ पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.४ ऑगस्ट,२०२५ चे पत्र कृ. पहावे

२. क्र.सा.का.सं/३६५६ सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे दि.१ ऑगस्ट,२०२५ चे पत्र कृ. पहावे.

उपरोक्त विषयास अनुलक्षून राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठ/संचालनालयानी अधिनस्त महाविद्यालयांना "हर घर तिरंगा" मोहीम साजरी करण्याबाबत सूचित करावे. तसेच उपक्रमाच्या कालावधीत राज्यातील प्रत्येक नागरीकांच्या घरावर तसेच सर्व शासकीय/निमशासकीय, खाजगी आस्थापना, सहकारी संस्था यांच्या कार्यालयावर राष्ट्रध्वजाची उभारणी करण्याचा उपक्रम पार पाडावा.

"हर घर तिरंगा" उपक्रम राबविताना भारतीय ध्वजसहिंतेचे पालन होणे आवश्यक असून जाणते अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याबाबतची दक्षता घेणे विषयी नागरिकांमध्ये जनजागृती करुन विशेष काळजी घ्यावी. हर घर तिरंगा अभियान संपुर्ण देशामध्ये दिनांक ०२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येणार येईल. "हर घर तिरंगा' अभियाना अंतर्गत विविध कार्यक्रम / उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. हर घर तिरंगा अभियान साजरे करण्या संदर्भात केंद्र शासनाकडून एक सादरीकरणही प्राप्त झाले आहे. उक्त सादरीकरणही आपणास या प्रत्रासोबत अग्रेषित करण्यात आलेले आहे. आपणास विनंती करण्यात येते की, या सादरीकरणामध्ये नमूद केलेल्या सूचना / कार्यक्रम / उपक्रम यावर आपणाकडून योग्य नियोजन आखणी करण्यात यावी. याबाबत आपणाकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य शासनाच्या या कार्यालयास पाठविण्यात यावा.

**सोबत:- केंद्र शासनाकडील सादरीकरण**

**(डॉ.मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना,
महाराष्ट्र शासन